


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १८ सप्टेंबर १९४६ अंक ३८

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी,
श्री. म. वि. गोखले, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर

—भाण्डवल—

अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,७०,००,०००

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, सोलापूर, धुळें, चाळिसगांव व फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## सन १९४५ मधील प्रगति

नवें काम ७,००,००० रु.
चालू काम १०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

## कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

### ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात

कॅपिटल कंट्रोल ऑर्डर १४/अ अन्वयें दिलेल्या सवलतीनुसार आरंभापैकीं उरलेले

दोन लक्षांचे ६ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विक्रीस काढले आहेत.

कृष्णा किनूर, जि. बेळगांव

विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंन्स.

अधिक माहिती—रा. डी. एच. बेडेकर
सरदार विंचूरकरांचा वाडा, सदाशिव पेठ, पुणें २. यांचेकडून मिळेल.

## विविध माहिती

**जनरल मॅनेजर पाहिजे**—कोल्हापूर येथील बँक ऑफ कोल्हापूर या बँकेस १५००–२००० रु. वेतनावर जनरल मॅनेजर पाहिजे आहे.

**लंडनमधील काळा बाजार**—लंडनमधील गुन्ह्यांची संख्या १९४५ सालीं पुष्कळच वाढली. एकुण २,३८८ खटल्यांत काळा बाजारवाल्यांना शिक्षा झाली. १९४४ सालीं हा आकडा १,८४४ होता.

**जर्मनीवर हुकमत ठेवण्याचा प्रचंड खर्च**—जर्मनीशीं युद्ध संपून एक वर्ष होऊन गेलें, तरी ग्रेट ब्रिटन आपल्या मुख्य शत्रूच्या प्रीत्यर्थ दरसाल ८ कोटि पौंड खर्च करीत आहे! जर्मनीची विभागणी, तेथील अन्नाचा तुटवडा, कोळशाचें दुर्भिक्ष्य, जीवनोपयोगी जिनसा मिळण्याची मारामार, इत्यादि कारणांमुळें जर्मनीवर हुकमत ठेवणें ग्रेटब्रिटला फार महाग पडत आहे.

**ब्रिटिश कापडाचें उत्पादन**—ब्रिटिश कापडास मागणी पुष्कळ आहे. परंतु तें विणण्यास सूत लागतें तें करण्यासाठीं स्पिनिंगच्या गिरण्यांत जरूर तेवढे कामगार नाहींत अशी अडचण आहे.

**इंग्लंडमध्यें रेल्वे-एंजिनांत तेलाचें जळण**—ब्रिटिश मेन-लाइन रेल्वे कंपन्यांना शक्य तितक्या लवकर कोळशाऐवजीं तेलाचें जळण वापरण्याची परवानगी ब्रिटिश वाहतूक खात्यानें दिली आहे. यामुळें वार्षिक दहा लक्ष टन कोळशाची बचत होईल.

**सन्मित्र को. अर्बन बँक लि., मुंबई**—वरील बँकेची १९४५–४६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, ता. २१।९।१९४६ रोजीं विष्णुबाग, शेणवीवाडी, मुंबई, ४ येथें होणार आहे!

**ग्रेट ब्रिटननें कर्जाचा दुसरा हप्ता घेतला**—अमेरिकेनें ग्रेटब्रिटनला मंजूर केलेल्या कर्जापैकीं पहिला ३० कोटि डॉलर्सचा हप्ता त्यानें जुलैमध्यें घेतला होता, आतां त्यानें आणखी १० कोटि डॉलर्सची उचल केली आहे. एकूण ३७५ कोटि डॉलर्सचें कर्ज अमेरिकेनें मंजूर केलेलें आहे.

**अमेरिकेंतील शिलकी मालमत्ता**—अमेरिकेंत विकल्या जाणाऱ्या १७० कोटि डॉलर्स किंमतीच्या मालमत्तेपैकीं कांहीं भाग इतर देशीयांना विकत मिळेल असें वॉशिंग्टन येथून गेल्या २६ तारखेस जाहीर करण्यांत आलें. याचें कारण असें सांगण्यांत आलें आहे कीं शिलकी मालांतील यांत्रिक सामुग्रीला अमेरिकेंत मागणी नाहीं, परंतु तीच सामुग्री दोस्त राष्ट्रांना युद्धोत्तर पुनर्रचनेकरतां उपयोगी पडेल.

**विक्रीकर कायद्यांत अनुभवानंतर दुरुस्ती**—सेल्सटॅक्सचे बाबत अडचणी वाटतील त्या नाहींशा करण्यासाठीं एक वर्षाचे अनुभवानंतर जरूर त्या दुरुस्त्या करण्याचा मुंबई सरकारचा मानस आहे.

**श्री. मराठे ह्यांचें भाषण**—श्री. एस. एस. मराठे ह्यांचें नुकतेंच मुंबई येथें इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचे विद्यमानें व्याख्यान झालें. हिंदुस्थानांत यंत्रसामुग्रीचें उत्पादन करणें कसें शक्य आहे, ह्याचें व्याख्यात्यांनीं प्रतिपादन केलें.

**अमेरिकेंत वाहतुकीची कठिण परिस्थिति**—रेल्वेच्या मालवाहू डब्यांच्या कमतरतेमुळें अमेरिकेंत वाहतुकीची परिस्थिति गंभीर झाली आहे. गहूं, इमारती लाकूड, कोळसा वगैरे माल परदेशीं व देशांतील निरनिराळ्या शहरीं पाठविणें बिकट झालें आहे.

## शेअर बाजार

(श्री व. वि. लोणकर)

बाजारांत घबराट हें मंदीचें वातावरण सुरू झालें असून लंडन व न्यूयॉर्क बाजाराच्या घटीचा परिणाम आतां होत आहे असें बोलतात. इतके दिवस जसें कांहीं मुंबई त्यांच्याच तोंडाकडे पहात होती! सटोडियांना हव्या त्या गोष्टींचा उपयोग करून घेऊन स्वतःच्या मर्जीप्रमाणें बाजार फिरवावयाचा असतो येवढेंच. बाजार पुढें मंदींत जाण्याचीं चिन्हें असल्यानें उफाळी आल्यास विकत रहावें येवढेंच सांगतां येईल.


# दि सुप्रीम म्यूच्युअल अशुअरन्स कंपनी लि.,

**हेड ऑफिस :**
८६६ सदाशिव पेठ, पुणें २

**शाखा:—नागपूर, हुबळी व कराची**

वसाहतीच्या योजनाः—पुणें, सोलापूर, माझगांव, (बेळगांव)

आकर्षक विम्याच्या योजना, सवलतीचे हप्त्याचे दर व विमेदारांना जास्तींत जास्त फायदा. ह्यासाठीं विमेदार हीच कंपनी नेहमी पसंत करतात.

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

सर्व प्रमुख गांवीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

## ★ बँक ऑफ पूना लि. ★

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु २५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

शेट मुरलीधर चतुर्भुज लोया (चेअरमन); शेट डी. आर. नाईक, जे. पी. (व्हाइस चेअरमन); डॉ. ना. भि. परुळेकर, M.A., Ph.D., (संचालक 'सकाळ'); शेट लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी; शेट फ्रामजी पी. पोचा; शेट नारायणदास श्रीराम सोमाणी.

हेड ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें.
शाखा—(१) ३६१ सदाशिव पेठ, पोस्टासमोर,
(२) ११ भवानी पेठ, पुणें.

सेफ डिपॉझिट लॉकरची अल्प भाड्यांत सोय.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. उद्योगधंद्यांना व व्यापारवाढीला सवलत. पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

Success G. G. SATHE, ॲक्टिंग मॅनेजर.



## शेतांच्या तुकड्यांस प्रतिबंध व त्यांचें एकत्रीकरण

### मुंबई सरकारचें बिल

#### तुकड्यांस प्रतिबंध करण्याचा उद्देश

१ शेतांचे अतिशय बारीक तुकडे पडत जातात त्यामुळें शेतीचा अवजारें, बीं, बैल व इतर सामान एका तुकड्यांतून दुसरीकडे नेण्यांत वेळ आणि श्रम निष्कारण खर्च होतात. बांधासाठीं बरीच जागा मोकळी ठेवावी लागते व त्यांत पिकें करणें शक्य नसतें. बांध, कुंपण इत्यादि सुधारणा करणें त्यामुळें कोणी हातीं घेत नाहीं, कारण अशा सुधारणा आर्थिक दृष्ट्या किफायतशिर वाटत नाहींत. असेर, जमिनीची उत्पादन-शक्ति कमी कमी होत जाते. हे दुष्परिणाम शक्य तितके टाळण्यासाठी मुंबई सरकारनें प्रस्तुत बिल तयार केलें आहे.

#### व्याप्ति

२ हा कायदा सबंद प्रांतास लागू आहे व सरकार ठरवील त्या भागांत व दिवशीं तो अंमलांत येईल.

#### 'तुकडा'

३ प्रांतिक सरकार कोणतेंहि खेडें, महाल, तालुका किंवा त्यांचा कोणताहि भाग 'लोकल एरिआ' म्हणून जाहीर करील. स्वतंत्र शेत म्हणून किती क्षेत्रफळाचें स्वतंत्र जागेंत किफायतशिरपणें पीक करतां येईल, हें प्रत्येक 'लोकल एरिआ' साठी सरकार ठरवील. त्यावर सरकार लोकांच्या तक्रारी मागवील. त्या ऐकून घेऊन, प्रत्येक 'लोकल एरिआ' साठी प्रत्येक प्रकारच्या जमिनीचें 'विशिष्ट क्षेत्र' सरकार निश्चित करून जाहीर करील. त्यानंतर, जमिनीच्या तुकड्यांची रेकॉर्ड ऑफ राइट्समध्यें नोंद होईल.

कोणीहि, कोणताहि जमिनीचा 'तुकडा' म्हणजे ('विशिष्ट क्षेत्रा'पेक्षा बारीक असलेली जमीन) दुसऱ्यास वर्ग करूं शकणार नाहीं. दुसऱ्या जमिनीशीं तो जोडला जात असेल, तरच तो वर्ग करतां येईल. जमिनीचा तुकडा शेजाऱ्यासेगीज इतरांस खंडानें देतां येणार नाहीं. कोणतीहि जमीन वर्ग केल्यामुळें तुकडा निर्माण होत असेल, तर अशी जमीन वर्ग करतां येणार नाहीं. प्रस्तुत कायद्याचे विरुद्ध होणारा व्यवहार बेकायदा ठरेल व वर्ग केलेली जमीन जप्तीस पात्र होईल. जमीन घेणारा किंवा देणारा ह्यांपैकी कोणासहि नुकसानभरपाई मिळूं शकणार नाहीं. कोणीहि सरकारला मात्र तुकडा विकूं शकेल. त्याची किंमत कलेक्टर ठरवील.

#### विभागणी व ॲक्विझिशन

(४) सरकारला जमीन महसूल भरणाऱ्या इस्टेटीची कलेक्टरानें विभागणी केली, तर त्यामुळें तुकडा निर्माण होतां कामा नये अशा बेतानेंच ती केली पाहिजे. जरूर तर तुकड्याची पैशानें भरपाई करावी. सरकार किंवा स्था. स्व. संस्था जागा अक्वायर करील, तेव्हां त्या जागेपैकीं तुकडा उरणार नाहीं, अशी खबरदारी घेतली पाहिजे. (अपूर्ण)

---

**अमेरिकेंतील कपाशीचें उत्पादन**—अमेरिकेंतील १९४६ मधील कपाशीच्या उत्पादनाचा अंदाज ९१ लक्ष, ७१ हजार गांठींचा आहे. गेल्या वर्षी ९० लक्ष, १५ हजार गांठींचें उत्पादन झालें होतें.

**मुंबईच्या मजुरांच्या रहाणीच्या खर्चाचें वाढतें 'मान'**—जून, १९३४ अखेरच्या वर्षातील खर्चाचें मान १०० मानलें, तर जुलै १९४६ ह्या महिन्यांत तें २६८ झालें. जून १९४६ मध्यें तें २५९ होतें.

**बडोदे येथें रेडियो स्टेशन**—जानेवारी १९४७ पासून बडोदे येथें रेडियो स्टेशन सुरू होणार आहे. तेथून मध्यम लहरीवर ध्वनिक्षेपण होईल; सध्यां प्रायोगिक ध्वनिक्षेपण सुरू आहे.

**अमेरिकेवरील आर्थिक संकट**—ह्या वर्षी अमेरिकेच्या ३५ मोठ्या रेल्वे कंपन्यांच्या पहिल्या सहामाहीच्या व्यवहारास शेंकडा २४ टक्के घसरण लागून ५० लक्ष पौंडांची तूट आली आहे. 'जनरल मोटार्स' ह्या मोटारींच्या धंद्यांतील सर्वांत अग्रगण्य कंपनीनें ह्या वर्षी फक्त ३,१६,००० मोटारी तयार केल्या. युद्धापूर्वी हीच कंपनी वार्षिक १४ लक्ष मोटारींचें उत्पादन करीत होती.


**मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.**

**नोटीस.**

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार ता. २८ सप्टेंबर १९४६ रोजीं दुपारीं ३ वाजतां (स्टॅ. टा.) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, (सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेकहाऊस लेन, कोट, मुंबई) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

(१) ३० जून १९४६ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.
(२) नफ्याची वांटणी करणें व डिव्हिडंडचा दर ठरविणें.
(३) डिरेक्टरांची निवडणूक करणें.
(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
व्ही. पी. वर्दे,
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई,
ता. २४-८-४६

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्सफर बुकें) ३० सप्टेंबर १९४६ ते १९ ऑक्टोबर १९४६ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

---

**पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर**

**नोटीस**

पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २९ सप्टेंबर १९४६ रोजीं दुपारीं ५-३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाच्या असेंब्ली हॉलमध्यें भरून त्या सभेंत सन १९४५-४६ सालचा ताळेबंद, नफ्याची वाटणी, पोटनियमांच्या दुरुस्त्या करणें, पुढील सालासाठीं बँकेचे डायरेक्टर्स, चेअरमन, व्हा. चेअरमन, हिशेब तपासनीस नेमणें, सरकारी व बँकेनें नेमलेले हिशोब तपासनीस यांच्या तपासणी याद्यांचा विचार करणें, वगैरे कामें करण्यांत येतील. डायरेक्टर्स व हिशेब तपासनीस यांच्या निवडणुकीचीं मतें देण्याची वेळ ता. २९।९।१९४६ रोजीं सकाळीं ९ ते दुपारीं १२-३० वाजेपर्यंत आहे. तरी सदर सभेस व निवडणुकीस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
द. वि. चितळे,
म्यानेजिंग डायरेक्टर.

पुणें शहर
ता. ७-९-१९४६

---

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

---

**साठे बिस्किटें**

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्तरस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा या बाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणामुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

**व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी.**

## अपघाताचा विमा

हिंदुस्थानांतील विमाव्यवसाय अजून बाल्यावस्थेंत असल्यामुळें अपघाताचे विमे उतरण्याची पद्धत आपल्याकडे फारशी पसरलेली नाहीं. अपघात या शब्दांतच त्या प्रसंगाची अनपेक्षितता सूचित केली जाते हें खरें असलें तरी त्यासंबंधीं योग्य तरतूद करण्याची यातायात मनुष्य सहसा करीत नाहीं. पण अपघात हा केव्हां व कसा घात करील हें सांगतां येत नाहीं. याविषयीं एक बोधप्रद प्रसंग नुकताच लंडन येथें घडून आला. महायुद्धाचा विजयदिन साजरा करण्याकरितां लंडनमध्यें नुकताच जो उत्सव करण्यांत आला त्यांत आतषबाजीची करमणूकही आखण्यांत आलेली होती. हा आतषबाजीचा देखावा बघण्यासाठीं लंडनमधील हजारों नागरिक वेस्टमिन्स्टरच्या आसपास जमा झालेले होते. त्यांतच ३४ वर्षें वयाची एक शिक्षिका दारूकाम पहात असतां एकाएकीं मटकन् खालीं बसली. शोध करतां असें आढळून आलें कीं दारूकामांतीलच एक बाण त्या शिक्षिकेच्या रोखानें आला आणि तिच्या कपाळावर त्यानें खोल जखम केली. या शिक्षिकेला तावडतोब इस्पितळांत नेण्यांत आलें. परंतु दुसऱ्याच दिवशीं ती कालवश झाली. आनंदोत्सवांत घडून आलेल्या या चमत्कारिक अपघातामुळें एक बिकट कायदेशीर प्रश्न उत्पन्न झाला आहे. हें दारूकाम ब्रिटनच्या मिनिस्ट्री ऑफ वर्क्सतर्फे करण्यांत आलेलें असून प्रत्यक्ष बत्ती देण्याचें काम एका कंपनीकडे होतें. आतां सदर बाईला नुकसानभरपाई द्यावयाची ती कोणीं ? इंग्लंडच्या फडणिशी खात्याकडे नुकसानभरपाईची मागणी केली तर ती कितपत यशस्वी होईल याविषयीं शंकाच आहे; कारण दारूकामाची जबाबदारी त्या खात्याकडे असली तरी त्या दारूकामाला बत्ती देण्याचें काम दुसऱ्याच कंपनीनें केलें होतें. त्यामुळें केवळ कायदेशीर दृष्ट्या ती कंपनीच जबाबदार धरली जावी हेंच सयुक्तिक दिसतें. उलटपक्षीं कंपनी असें म्हणूं शकेल कीं दारूकाम सरकारी खात्यातर्फेचे एजंट म्हणून कंपनीनें केलेलें होतें. अर्थात त्यांतून उद्भवलेल्या अपघाताची जबाबदारी एजंट नेमणाऱ्या मालकाकडे जाते. अशा तऱ्हेनें उत्पन्न झालेल्या या कायदेशीर अडचणींतून मार्ग कसाही निघो. परंतु उत्सवप्रसंगीं होणाऱ्या अपघाताचे विमे उतरले जाणें कसें इष्ट आहे हें वरील प्रसंगावरून दिसून येईल. हिंदुस्थानांतही यात्रा, उत्सव-समारंभ अशा प्रसंगीं होणाऱ्या अपघातांपासून विम्यांचें संरक्षण मिळण्याची व्यवस्था करतां येणें शक्य आहे.

---

## कराड अर्बन को. बँक लि.


श्री. ल. म. उर्फ नानासाहेब देशपांडे हे वरील बँकेचे १९३३ सालापासून चेअरमन असून त्यांच्या मार्गदर्शनाखालीं बँकेनें मुंबई प्रांतांतील चांगल्या तऱ्हेनें चाललेल्या बोटांवर मोजण्याइतक्या अर्बन बँकांत वरचा नंबर मिळविला आहे. उतार वयामुळें ते आतां सेवानिवृत्त होत आहेत, ह्या निमित्तानें बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें त्यांच्या कामगिरीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. १९४४–४५ चे मानानें बँकेचें खेळतें भांडवल सुमारें दुप्पट झालें आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस २४,९७० रु. नफा झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळणार आहे. बँकेचा जंगल माल तारणावरील व्यवहार दिवसेंदिवस वाढत आहे, त्यासाठीं गोडाऊन व सेफ डिपॉझिट व्हॉल्ट बांधण्याचा विचार आहे. अशा रीतीनें बँकेची उत्कृष्ट प्रगति होत आहे.

---

## नगर सेंट्रल को. बँकेंत तैलचित्रांचें अनावरण

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर या बँकेचे संस्थापक व माजी चेअरमन ( १९१० ते ३० ) कै. रा. ब. भाऊसाहेब चितळे व माजी चेअरमन ( १९३० ते ४२ ) श्री. भाऊसाहेब फिरोदिया, स्पीकर मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, यांच्या तैलचित्रांचें अनावरण अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे हस्तें ता. ४-९-४६ रोजीं झालें. बँकेचे चेअरमन श्री. काकासाहेब चिंचोरकर ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर वरील चेअरमनद्वयांच्या कामगिरीची वक्त्यांनीं प्रशंसा केली. श्री. मेहता ह्यांनीहि चेअरमनद्वयांची सहकारी क्षेत्रांतील चिरस्थायी कामगिरी गौरविली. " सहकारी चळवळ ही जनतेंतील पुढाऱ्यांनीं लक्ष घातल्यास कशी लोकोपयोगी होते हें या बँकेच्या उदाहरणानें सिद्ध होतें " असें ते म्हणाले.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें ! अत्यंत लोकप्रिय. किं, १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालीच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

बिनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट : सितारामं एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याजवजा
+टाटा डिफर्ड रु. १२९-८-९ } दि. १०-९-४६
+ ,, ऑ. रु. २३-०-० }
कोहिनूर रु. १२ दि. १७-९-४६
डाइंग रु २५ दि. २६-९-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १०।९।४६ | बुधवार ११।९।४६ | गुरुवार १२।९।४६ | शुक्रवार १३।९।४६ | सोमवार १६।९।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | ३१४३-१२+ | ३१५७—८ | ३०५५—० | २९६५—० | २९६२—८ |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५६३—+ | ५६१—० | ५४९—० | ५३८—० | ५४१—० |
| ३३२२-८; १७६३-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | ३०५०—० | ३०५५—० | २९६०—० | २८२५—० | २७६५—० |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | १०४२—० | १०५०—० | ९८५—० | ९५५—० | ९३६—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८२५—० | ८२५—० | ७८ —० | ७६८—० | ७५०—० |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४५८—० | ४५४—० | ४४४—० | ४४२—० | ४३२—० |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४३२—० | ४३८—८ | ४१२—० | ४२५—० | ४२५—० |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ४४४—० | ४४२—० | ४२८—० | ४१८—० | ४१०—० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै. | सिंप्लेक्स | ५० | ४६८—० | ५७०—० | ४५०—० | ४३४—० | ४३२—० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—८ | ५-११ | ५-९-६ | ५-५-० | ५-४-६ |
| १७१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २५-७-६ | २५-१० | २४-१२ | २३-१४-० | २३—३ |
| ३-१०; २९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ५-४-६ | ५—७ | ५-६-६ | ५-३-० | ४-१५-६ |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८७५—० | ८८०—० | ८४८-१२ | ८३७—८ | ८४७—८ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २४८—८ | २४९—८ | २४६—० | २४३—० | २४३—८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३२१—० | ३२०—८ | ३०९—० | ३०६—० | ३०७—० |
| ५९२-८; ५१००० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ७३५—० | ७२२—८ | ६९०—० | ६७५—० | ६६५—० |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ५१—६ | ५१—६ | ५०-१२ | ४९—८ | ४८-१० |

शुक्रवार दि. ६-९-४६ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १९५—० | आंध्र व्हॅली | १९६५—० | अलकॉक | ६३५—० |
| सेंट्रल | १३१—० | बॉम्बे ट्रॅम | १४०—० | बॉम्बे स्टीम | ७३०—० |
| इंडिया | २५०—० | टाटा हायड्रो | २१५—० | न्यू इंडिया | ११२—४ |
| इंपी० | २८९०—० | टाटा पॉवर | १९५५—० | शिवराजपुर | ५५—० |
| | ७०७—८ | | | टाटा केमिकल | २४—० |
| रिझर्व्ह | १५९—० | | | टाटा ऑईल | ११८—० |


आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

पॉटरी कारखान्याच्या उभारणीसाठी
ठेवी घेणें आहेत

## त्रिप्ला कमर्शिअल कं. लि.

सरस्वती-विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.

ठेवींचे दर

एक वर्ष-४½%; तीन वर्षें-५%; पांच वर्षें-६%.

अर्जाचा नमुना व माहितीपत्रक मागवा.

सोमण रानडे ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस.

## आपले अनुभव कळवा

" आम्हीं " मृत्युलोकचा प्रवास " या पुस्तकाची सुधारून वाढविलेली द्वितीयावृत्ति छापण्याचें काम सुरू केलें आहे, तरी अर्थाचे वाचकवृंदांस प्रेमाची विनंति कीं, या महत्त्वाच्या विषयावर कोणास कांहीं नवीन शास्त्रीय शोध सुचले असल्यास ते त्यांनीं ता. १५।१०।१९४६ पर्यंत **मेसर्स विपट आणि मंडळी, कराड जि. सातारा** या पत्त्यावर कळवावेत. उपयुक्त ज्ञानाचा आभारपूर्वक स्वीकार केला जाईल व नवीन आवृत्ति तयार होतांच तिची एक प्रत अशा लेखक मित्रांस विनामूल्य पाठविली जाईल. "

## हंगामी सरकार व बडा व्यापारी वर्ग

राष्ट्रिय हंगामी सरकार स्थापन झाल्याबद्दल श्री. घनश्यामदास बिर्ला यांनी हार्दिक आनंद व्यक्त केला असून हिंदुस्थानांतील भांडवलदार व व्यापारी वर्गानें राष्ट्रीय चळवळीस नित्य यथाशक्ति मदत करण्यांत अभिमान बाळगला आहे व नव्या राष्ट्रीय सरकारला या वर्गाचें संपूर्ण सहकार्य मिळेल असें आश्वासन दिलें आहे. राष्ट्रीय सरकार हें भांडवलशाहीच्या हितसंबंधास अनुकूल असणें न्यायतः व साहजिकपणेंच संभवनीय नाहीं, तरी सुद्धां हिंदुस्थानच्या अभ्युदयाचे कामीं व सांपत्तिक विषमता दूर करण्याचे कामीं राष्ट्रीय सरकारला भांडवलदारवर्गाकडून सहकार्य मिळेल असेंहि त्यांनीं जाहीर केलें आहे.

'बॉम्बे प्लॅन' चा एक प्रयोजक म्हणून हिंदुस्थानच्या अभ्युदयाचे कार्याची आखणी राष्ट्रीय सरकारच करूं शकेल असें मत श्री बिर्ला यांनीं प्रतिपादिलेलें होतें; आतां तसें सरकार प्रस्थापित झालें आहे तेव्हां या कार्यास सुरवात करावी अशी त्यांची सूचना आहे.

देशापुढें सध्या पहिला प्रश्न अन्नटंचाईचा आहे. पुढील पांच वर्षांत हिंदुस्थानांतील अन्नोत्पादनांत निदान तीस टक्के तरी वाढ झालीच पाहिजे, नाहीं तर आपल्याला परदेशी धान्याच्या आयातीवरच विसंबून राहावें लागेल अथवा उपाशी मरावें लागेल. दुसरी गोष्ट कापड टंचाईची. ही टंचाई दूर करावयाची तर हिंदी कापडाची निर्मिति निदान पन्नास टक्क्यांनीं तरी वाढली पाहिजे. त्याचप्रमाणे साखर, सिमेंट, कागद, पोलाद, औषधें व यांत्रिक साधनसामुग्री यांचाहि पुरवठा वाढणें जरूर आहे.

बेकारी, महागाई व चलनवाढ यांवरहि उपाय योजणें जरूर आहे. देशाचें औद्योगिक उत्पादन वाढविणें हाच त्यावर निश्चित उपाय आहे. नुसत्या नियंत्रणांनीं कांहीं होणार नाहीं; केवळ काळ्या बाजारांना वाव मात्र होईल.

देशांतील लाखों खेडीं अज्ञान, दारिद्र्य व रोगराईंत खितपत पडलीं आहेत. त्यांची पुनर्घटना होणें जरूर आहे. असेच दुसरे अनेक प्रश्न निकडीनें सोडविणें जरूर आहे.

या सर्व प्रश्नांचा अभ्यासपूर्वक विचार करून बॉम्बे प्लॅनची आंखणी केली आहे. राष्ट्रीय सरकार असेल व खंबीरपणानें कार्य करण्याचा त्याचा इरादा असेल तर पंधरा वर्षांत वरील प्रश्न निश्चितपणें सोडविले जाऊन हिंदुस्थानांत नव्या सुबत्तेची परिस्थिति निर्माण होईल.

यासाठीं अत्यंत व्यवहार्य अशा बॉम्बे प्लॅनचा अंगिकार राष्ट्रीय सरकारनें करावा अशी श्री. बिर्ला यांनीं आग्रहाची सूचना केली आहे व हंगामी राष्ट्रीय सरकारास आपल्या कार्यांत यश चिंतिलें आहे.

## रशियन चित्रपटांची राष्ट्रीय पार्श्वभूमि

स्टॅलिनच्या नव्या पंचवार्षिक योजनेंत रशियन चित्रपटांसाठीं खालील उद्दिष्टें आखण्यांत आलीं आहेत.

( १ ) पंच वार्षिक योजनेबाबत उत्साह निर्माण करणें, ( २ ) माजी व आजी रशियन शास्त्रज्ञांच्या कार्याचें महत्त्व समजावून सांगणें, ( ३ ) भांडवलशाहीपेक्षा सोव्हिअट पद्धत श्रेष्ठ कशी आहे हें पटवून कम्युनिस्ट पक्षाची भूमिका स्पष्ट करणें, ( ४ ) रशियाचें अखंडत्व निदर्शनास आणणें, ( ५ ) राष्ट्रभक्तीस महत्त्व देऊन दुसऱ्या महायुद्धांतील वीरांच्या कथांच्या आधारानें राष्ट्राबाबत कर्तव्यावर भर देणें, ( ६ ) तरुण प्रेक्षकांसाठीं लष्करांतील जीवनाचें चित्रीकरण करणें व ( ७ ) शास्त्रें व उद्योगधंदे ह्यांच्या प्रगतीचा इतिहास कथन करणें.

१९५० चे अखेर, रशियांतील चित्रपट गृहांची संख्या दुपटीनें वाढविण्यांत येईल.

**ग्रेटब्रिटनमधील दूधपुरवठा**—युद्धापूर्वीच्या मानानें आतां ग्रेट ब्रिटनमध्यें ४०% अधिक दूध खपतें.

**दारुगोळ्याच्या कारखान्यांत खतें तयार होणार**—अमेरिकेंतील ९ व्यापारी कंपन्या दारुगोळ्याच्या १७ कारखान्यांत पुढील महिन्यापासून खतें तयार करणार आहेत. ज्यांची युद्धानें नासाडी झाली असेल त्या देशांना हीं खतें उपयोगी पडून त्यांच्या शेतीची स्थिति लवकर सुधारेल. ह्या कारखान्यांमध्यें दर महिन्यांत ७०,००० टन अमोनियम नैट्रेटचें खत तयार होईल.

दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल
रु. १,००,०००

भरणा झालेलें भांडवल
रु. ३४,५००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
महा-कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें







पुणें चीफ एजंट:—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक,




छत्रे यांचा कोल्हापुरी- संगीत चिव
वापरून पाहुण्यांस खूष ठेव
किंमत १ रत्तलाला २ रुपये
मालकः—एन. व्ही. वेलणकर,
फो. नं. ३३८४९ ]







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१८ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.